<u>प्रेसनोट</u>

दि.१२/०८/२०२०

## नारायणगांव पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथील सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचाऱ्यावर लाच मागणी केल्या प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | नारायणगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.र.नं. २४८/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - १) अर्जुन केशव घोडेपाटील, वय - ३८ वर्षे, सहायक पोलीस निरीक्षक (API)<br>नेमणुक - नारायणगांव पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण<br>२) धर्मात्मा कारभारी हांडे, वय ३७ वर्षे, पोलीस शिपाई, ब.नं. ८७०<br>नेमणुक - जिल्हा विशेष शाखा, पुणे ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- (पाच लाख रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- ०७/०८/२०२०,<br>गुन्हा दाखल दिनांक :- ११/०८/२०२०<br>यातील तक्रारदार यांचेविरुद्ध दाखल असलेल्या गुन्हयाचे दोषारोपपत्र लवकरात लवकर कोर्टात दाखल करण्यासाठी मदत करून त्या गुन्हयात इतर दोन आरोपींना अटक न करण्यासाठी आरोपी लोकसेवक २ याने आरोपी लोकसेवक १ याचेसाठी तक्रारदार यांच्याकडे पाच लाख रूपयांची लाचेची मागणी केली. सदर लाच मागणीस आरोपी लोकसेवक क्र.१ यानी सहमती दर्शवून आरोपी लोकसेवक क्र. २ यास लाच घेण्यास प्रेरीत केले म्हणून वरिलप्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.<br>अटक आरोपी लोकसेवक याना मा. विशेष न्यायालय खेड येथे हजर केले असता न्यायालयाने दिनांक १३/०८/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली असून गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री. सुनिल बिले पुणे युनिट हे करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.